जा. क्र. १२९ /प्र.थ.क./लेखा/२०१८
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
सिडको भवन, ४ था मजला, दक्षिण कक्ष,
बेलापूर, नवी मुंबई
दिनांक - २४/०४/२०१८

प्रति,

मुख्य कार्यकरी अधिकारी
जिल्हा परिषद (सर्व)

**विषय :** लाभार्थ्यांच्या अनुदानातुन प्रलंबित / थकित कर्जाची वसुली न करण्याबाबत.

**संदर्भ** : सह. सचिव (ग्रामीण गृहनिर्माण), ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे अर्धशासकिय पत्र क्र. J-११०६०/३२/२०१७-RH दि. ०३/०७/२०१७

सहसचिव (ग्रामीण गृहनिर्माण), ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे उपरोक्त संदर्भाधिन पत्रास अनुसरून कळविणेत येते की, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत "सर्वांना घरे" या केंद्र शासनाच्या धोरणानुसार सन २०१६-१७ ते २०१८-१९ या कालावधीमध्ये १ कोटी घरकुलांचे बांधकाम पुर्ण करावयाचे आहे.

घरकुलांचे बांधकाम घरकुल मंजूर केलेचे दिनांकापासून १२ महिने कालावधीत पुर्ण करावयाचे आहे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण लाभार्थ्यांच्या खात्यावर PFMS प्रणालीद्वारे सरळरित्या निधी वितरित करणेत येतो. सदर निधी वितरणाचे वेळी असे निदर्शनास येत आहे की, **काही बँका लाभार्थ्यांना प्रथम हप्ता/द्वितीय हप्ता प्रदान करताना थकीत कर्जाची वसूली सदर प्रथम हप्ता/द्ववितीय हप्त्यामधुन करतात.** त्यामुळे लाभार्थ्याला ठरावीक कालावधीमध्ये घराचे बांधकाम पुर्ण करता येत नाही. त्यामुळे योजनेची अंमलबजावणी मंदावते.

तरी आपल्या जिल्हयातील ज्या बँकांमध्ये लाभार्थी खातेधारक आहेत, त्या बँकांना-प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण ही गरीब लोकांकरिता राबविणेत येणारी कल्याणकारी योजना आहे. सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी निधी प्राप्त होत असतो. जर हा निधी लाभार्थ्यांच्या खात्यातून परस्पर बँकांनी कर्ज वसुलीस वापरला तर या लाभार्थ्यांची घरे पूर्ण होणार नाहीत तसेच त्यांची मूलभूत गरज पूर्ण होऊ शकणार नाही. त्यामुळे **लाभार्थ्यांच्या खात्यामधून थकीत कर्जाची वसूली करु नये अशा सूचना आपले स्तरावरुन देणेत याव्यात.** केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सहपत्र : वरीलप्रमाण

**धनंजय माळी** (भा.रा.से.)
**संचालक**
**राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीणगृहनिर्माण**
**महाराष्ट्र राज्य.**

प्रत : १.मा.सचिव,ग्राम विकास व जलसंधारण विभाग,बांधकाम भवन मुंबई यांना माहितीसाठी
२.मा.उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन मुंबई यांना माहितीसाठी
३.उप आयुक्त (विकास) विभागीय आयुक्त (सर्व )यांना कार्यवाहीस्तव
४.प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,जिल्हा परिषद (सर्व) यांना कार्यवाहीस्तव